**खटला क्र. ७२१/पीडब्ल्यू/२०१३** **निशाणी क्र. ३६**

साक्षीदार क्र. २

मी शपथपुर्वक सांगतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | : राजेश गंगाराम पाणगळे, |
| वय | : ४७ वर्षे, |
| व्यवसाय | : खाजगी वाहन चालक, |
| पत्ता | : प्रभादेवी, मुंबई. |

**सरतपासणी सरकारी वकील श्री. रविंद्र पाटील यांचे तर्फे:—**

१. फिर्यादी विशाल हा माझा सख्खा लहान भाऊ आहे. मी व माझा भाऊ आगार बाजार, दादर (पश्चिम), मुंबई येथे रुम नंबर १ मध्ये कुटुंबासह राहत होतो व आहे. मी सर्व आरोपींना ओळखतो. आरोपी हे आम्ही राहत असलेल्या चाळीमध्ये शेजारी राहतात.

२. आरोप करण्यात आलेल्या घटनेच्या काळामध्ये विशाल व आरोपी क्र. २ (सदया मयत) यांची मुलगी श्रुतीका यांचे प्रेम संबंध होते. त्या कारणामुळे आमच्यात व आरोपींमध्ये वाद होते.

३. दि.०२.०६.२०१३ रोजी रात्री ११.१५ च्या सुमारात माझ्या घरी होतो. त्यावेळी मी झोपण्यासाठी अंथरुण टाकत होतो. त्यावेळी आरोपी क्र. १ ते ३ हे आमच्या दारासमोर आले. ते तिघेही त्यानंतर माझा भाऊ विशाल याला उद्देशून शिवीगाळ करत होते. त्यादिवशी काय घडले होते व ते आरोपी कश्यामुळे आमच्या दारात येवून शिवीगाळ करत होते ते मी घरात असल्याने त्याबाबतची माहिती झाली नाही. त्यानंतर विशाल हा घराबाहेर गेला. त्यानंतर आरोपींमध्ये व त्याच्यामध्ये धराधरी झाली. त्यानंतर आवाजामुळे काय चालले आहे ते बघण्यासाठी मी बाहेर आलो. त्यावेळी आरोपी व विशालमध्ये झटापट चालू होती. त्यामुळे मी भांडण सोडवण्यासाठीमध्ये पडलो. त्यावेळी आरोपी क्र. १ ओंकार हळदंणकर याने कोयत्याच्या सहाय्याने विशालवर उजव्या खांदयाला वार केला त्यामुळे तो खाली पडला. त्याच्यावर वार झाल्याने त्याच्या खांदयातून रक्त निघत होते. सदरील परिस्थिती पाहून मी विशालला वाचवण्यासाठी गेलो

असता आरोपी क्र. १ ओंकार याने माझ्या डोक्यावर देखिल वार केला. त्यामुळे माझया डोक्यावर डाव्याबाजूला मार लागला. त्यामुळे माझ्या डोक्याला जखम होवून तीन ते चार टाके पडले होते. तिथे जमलेल्या लोकांनी आम्हाला टॅक्सीत टाकून केईएम हॉस्पीटल येथे नेले. त्या दिवशी डॉक्टरांनी मला व विशालला तपासले. विशाल याला पुढील उपचारासाठी अंतर रुग्ण म्हणून दाखल करुन घ ेतले होते व मला डोक्याला टाके टाकून त्याच दिवशी सोडले होते. आम्ही उपचार घेत असताना त्या ठिकाणी पोलिस चौकशी करण्यासाठी आले होते.

४. ज्या कोयत्याने मारहाण करण्यात आल्याचा आरोप करण्यात आलेला आहे त्या कोयत्याचे वर्णन मी सांगू शकतो. त्या कोयत्याला अर्धा फुट लांबीची लाकडी मुठ होती. त्या लाकडी मुठीला अर्धा ते पावून फुट लोखंडी पाता होता. त्याप्रमाणे दोन ते तीन इंच लांबीचा त्या पात्याला वर्क आकार देण्यात आला होता. तो कोयता मी विशालला मारहाण करताना पाहिला होता. त्यामुळे मी तो कोयता ओळखू शकतो. मला आता आर्टिकल अ वर दाखल असलेला कोयता दाखवण्यात आला. तो कोयता मी ओळखतो. त्याच कोयत्याने मला व विशालला मारहाण झाली होती.

**<u>उलटतपास आरोपीकरीता ॲड. जगताप यांचेतर्फे :—</u>**

५. आरोपी हे आमच्याशी वाद घालत असत या कारणावरुन आम्ही आरोप करण्यात आलेल्या घटनेपूर्वी कधीही त्यांच्या विरुध्द पोलिस स्टेशनला तक्रार दाखल केली नव्हती. हे मला माहिती नाही की, आरोपी व त्यांच्या कुटुंबातील सदस्याने विशाल विरुध्द अदखलपात्र गुन्हयासंदर्भात तक्रारी दाखल केल्या होत्या. हे मला माहिती नाही की, आरोपी क्र. १ च्या आईने माझी पत्नी हर्षला हिच्या विरुध्द अदखलपात्र गुन्हयासंदर्भात तक्रारी दाखल केल्या होत्या. हे मला माहिती नाही की, आरोप करण्यात आलेल्या घटनेच्या दिवशी आरोपी क्र. १ ने विशाल, मी व माझे कुटुंबीय यांच्या विरुध्द अदखलपात्र गुन्हयासंदर्भात

तक्रारी दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोप करण्यात आलेल्या घटनेच्या १५ दिवस आधी श्रुतीका हिचा विवाह झाला होता. हे मला माहिती नाही की, श्रुतीकाचा विवाह जमल्यानंतर आम्ही ज्या वार्डमध्ये राहतो त्या वार्डच्या नगरसेवकांने माझा भाउ विशाल याला श्रुतीकाचा विवाह होईपर्यंत गोंधळ घालू नको अशी समज दिली होती.

६. हे म्हणणे खरे आहे की, आरोप करण्यात आलेल्या घटनेनंतर मी व माझा भाऊ असे एकत्रितच हॉस्पीटला गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोप करण्यात आलेल्या घटनेच्या रात्री १२.०० नंतर मला डॉक्टरांनी घरी सोडले होते. हे म्हणणे खरे आहे की, मला पुढील वैदयकिय उपचाराची गरज नव्हती म्हणून मला सोडण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या दिवशी हॉस्पीटलमधून थेठ घरी आलो होतो. आमच्या घरापासून दादर पोलिस स्टेशनचे अंतर साधारणपणे १ किलो मीटर ऐवढे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यानंतर स्वत:हून पोलिस स्टेशनला फिर्याद देण्यासाठी गेलो नव्हतो. (साक्षीदाराने स्वत:हून असे सांगितले की, तो व त्याचा भाऊ वैदयकिय उपचार घेत असताना दादर पोलिस स्टेशनचे पोलिस चौकशीसाठी त्याठिकाणी आले होते त्यामुळे तो पोलिस स्टेशनला गेला नव्हता.)

७. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी विरुध्द गुन्हा हा दि. ०३.०६. २०१३ रोजी नोंदवण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, माझा जबाब पोलिसांनी दि. ०४.०६.२०१३ रोजी नोंदवला.

**(न्यायालयाची प्रथम सत्राची वेळ संपल्याने पुढील सरतपास दुपाच्या सत्रापर्यंत तहकूब करण्यात येत आहे.)**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

स्वाक्षरी/—

**(वैभव व. कुलकर्णी)**

**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**

**दिनांक : १५/१२/२०२५.**

**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

<u>**खटला क्र. ७२१/पीडब्ल्यू/२०१३**</u> <u>**निशाणी क्र. ३६**</u>

साक्षीदार क्र. २

<u>**उलटतपास आरोपीकरीता ॲड. जगताप यांचेतर्फे:—**</u>

शपथेवर सुरु:—

८. मला आरोप करण्यात आलेल्या घटनेच्या दिवशी मार लागल्यानंतर मी त्याच दिवशी पोलिस स्टेशनला जावून त्याची तक्रार दिली होती. त्या तक्रारीवरुन त्याची अदखलपात्र रजिस्टरला नोंद करण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोप करण्यात आलेल्या घटनेच्या दिवशी पोलिस स्टेशन जावून तक्रार दिली होती असे न्यायालयात खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा जबाब नोंदवला त्यानंतर माझा पोलिस स्टेशनला जाण्याचा कधीही प्रसंग आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी देखिल मला पोलिस स्टेशनला बोलावले नाही.

९. मी **आर्टिकल अ** वर दाखल असलेल्या कोयत्याचे वर्णन पोलिसाना माझा जबाब सांगितले होते. पोलिसानी तपासा दरम्यान माझे व माझा भाऊ विशाल याचे रक्ताने माखलेले कपडे जप्त केले होते किंवा कसे याबाबत मला आठवत नाही. मी आरोप करण्यात आलेल्या घटनेनंतर केईएम हॉस्पिटलला पाहटे ४ ते ५ वाजे पर्यंत होतो. आम्ही आरोप करण्यात आलेल्या घटनेनंतर रात्री १२ वाजेपर्यंत केईएम हॉस्पिटलला पोहचलो होतो. मी आरोप करण्यात आलेली मारहाणीची घटना रात्री ११.०० वाजता घडली होती आणि ती मारहाण आरोपी क्र. १ ओंकार याने केली होती ही बाब आमच्यावर उपचार करणा—या डॉक्टरांना सांगितली नव्हती.

१०. पोलिसानी माझ्या सांगण्यानुसार माझा जबाब नोंदवला होता. माझा सरतपासातील व जबाबातील मजकूर की, “घटना ही आमच्या घराच्या दारासमोर घडली होती” हा खरा व बरोबर आहे. माझे लक्ष आता माझ्या जबाबातील मजकूर की, “आरोपी क्र. २ व ३ हे माझा भाऊ विशाल यास विचारु लागले की, माझा मुलगा ओंकार यास मारहाण का केली.” ही बाब पोलिसाना सांगितली नव्हती. सदरील बाब माझ्या जबाबामध्ये का नोंदवण्यात आलेली आहे

याचे कारण मला सांगता येणार नाही.

११. माझ्या सरतपासातील मजकूर की, "मी झोपण्यासाठी अंथरुण टाकत होतो. त्यावेळी आरोपी क्र. १ ते ३ हे आमच्या दारासमोर आले. ते तिघेही त्यानंतर माझा भाऊ विशाल याला उद्देशून शिवीगाळ करत होते." हा माझ्या जबाबामध्ये नमूद नाही. सदरील बाब माझ्या जबाबामध्ये का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

१२. माझ्या सरतपासातील मजकूर की, "विशाल हा घराबाहेर गेला. त्यानंतर आरोपींमध्ये व त्याच्यामध्ये धराधरी झाली. त्यानंतर आवाजामुळे काय चालले आहे ते बघण्यासाठी मी बाहेर आलो. त्यावेळी आरोपी व विशालमध्ये झटापट चालू होती. त्यामुळे मी भांडण सोडवण्यासाठीमध्ये पडलो." हा माझ्या जबाबामध्ये नमूद नाही. सदरील बाब माझ्या जबाबामध्ये का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

१३. माझ्या सरतपासातील मजकूर की, "त्यावेळी आरोपी क्र. १ ओंकार हळदंणकर याने कोयत्याच्या सहाय्याने विशालवर उजव्या खांदयाला वार केला त्यामुळे तो खाली पडला. त्याच्यावर वार झाल्याने त्याच्या खांदयातून रक्त निघत होते. सदरील परिस्थिती पाहून मी विशालला वाचवण्यासाठी गेलो असता हा माझ्या जबाबामध्ये नमूद नाही." सदरील बाब माझ्या जबाबामध्ये का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

१४. माझ्या सरतपासातील मजकूर की, "आरोपी क्र. १ ओंकार याने माझ्या डोक्यावर देखिल वार केला. त्यामुळे माझ्या डोक्यावर डाव्याबाजूला मार लागला. त्यामुळे माझ्या डोक्याला जखम होवून तीन ते चार टाके पडले होते. हा माझ्या जबाबामध्ये नमूद नाही." सदरील बाब माझ्या जबाबामध्ये का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

१५. हे म्हणणे खरे नाही की, माझा भाऊ हा आरोपी क्र. २ ची मुलगी श्रुतीका हिच्या प्रेमात पडला होता व सदरील बाब तिच्या घरच्यांना पसंत नव्हती म्हणून माझा भाऊ दारु पिवून त्यांना त्रास देत असे. हे म्हणणे खरे नाही की,

आरोपीच्या कुटुंबियानी माझ्या भावा विरुध्द ब—याच वेळा पोलिस स्टेशनला तक्रारी दिलेल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींच्या सदरील वर्तणामुळे आमचा त्यांच्यावर रोष होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोप करण्यात आलेल्या घटनेच्या दिवशी विशाल याने ओंकारला दारुच्या नशेमध्ये मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, विशालच्या सदरील कृत्याला मी, माझी आई व माझ्या पत्नीने पाठींबा दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, ओंकारला विशालने मारहाण केल्याबद्दल त्याच दिवशी पोलिस स्टेशनला जावून तक्रार दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदरील बाब आम्हाला समजल्याने आम्ही आरोपींना खोटया गुन्हयामध्ये अडकवण्याच्या उध्देशाने खोटे कारण देवून हॉस्पिटलला गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सल्लामसलत करुन वैदयकिय पुरावा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळेच तक्रार दाखल करायला विलंब झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोप करण्यात आलेल्या घटनेच्या दिवशी माझा भाऊ विशाल हा दारुच्या नशेमध्ये रस्त्यावर पडून त्यास जखम झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी विशाल याला आवरण्यासाठी गेलो असता मी देखिल रस्त्यावर पडून जखम झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे प्रत्यक्षात कुठलीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, भावाला मद्दत करण्यासाठी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासः—**

१६. काही नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

स्वाक्षरी/—
**(वैभव व. कुलकर्णी)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : १५/१२/२०२५.**